# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्र.
०२०–२५६०१३५३
ई–मेल
iqac@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष

## परिपत्रक क्र. २६३/२०१९

विद्यापीठाने गेल्या १३ वर्षात 'अविष्कार' या राज्यस्तरीय संशोधन स्पर्धेत उत्तुंग यश प्राप्त केल्यानंतर पुढचा टप्पा म्हणून विद्यार्थ्यांमधून उद्योजक व संशोधक निर्माण करण्याच्या दृष्टीने तसेच या स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना विद्यापीठातील सायन्स व इनोव्हेशन पार्क, इन्क्युबेशन सेंटर व **ASPIRE** सारख्या संशोधन प्रोत्साहन योजनांशी जोडण्याचा मनोदय मा. कुलगुरू महोदयांनी व्यक्त केलेला आहे.

याबाबीच्या पूर्ततेसाठी मा. कुलगुरू यांनी प्राचार्य डॉ. मोहन वामन यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने सदर योजनेच्या सर्वपैलूंचा साकल्याने विचार करून खालील प्रमाणे सुधारित कार्यपध्दती निश्चित केलेली आहे.

१. ग्रामीण तसेच दुर्गम भागातील प्रतिभावान विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्यासाठी **avishkar.unipune.ac.in** हे संकेतस्थळ विकसित करण्यात आलेले आहे.
२. राष्ट्रीय स्तरावरील ख्यातनाम विषय तज्ज्ञांकडून सदर संकल्पनांचे परिक्षण करून पहिल्या टप्प्यात प्रस्तावांची निवड करण्यात येईल, याबाबत सर्व स्पर्धकांना ऑनलाईन पध्दतीने कळविण्यात येईल.
३. निवड झालेल्या प्रस्तावांचे विभागीय स्तरावर सादरीकरण आयोजित करण्यात येऊन विद्यार्थ्यांना तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येईल.
४. विभागीय स्तरावर **(Zonal Level)** निवड झालेल्या स्पर्धकांकरिता विद्यापीठस्तरावर कार्यशाळा आयोजित करून त्यांच्या संकल्पना अंतिम स्पर्धेच्या दृष्टीने यथा योग्य करण्यासाठी प्रयत्न केले जातील.
५. सदर स्पर्धांच्या अंतिम संकल्पनांमधून स्पर्धेद्वारे गटनिहाय अंतिम स्पर्धकांच्या संघाची निवड करण्यात येईल.
६. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांची उच्च गुणवत्ता विचारात घेत ासदर प्रक्रियेतून पुढे येणाऱ्या नाविन्यपूर्ण व गुणवत्ताधारक संकल्पनांचे **Start-up** तसेच बौध्दिक संपदेत रूपांतरण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातील.
७. सदर संपूर्ण प्रक्रिया अविष्कार स्पर्धे पूरती मर्यादित न ठेवता वर्षभर निरंतरपणे राबविण्याबाबत धोरण आखले जाईल.
८. या एकंदर प्रक्रियेतून पुढे येणाऱ्या अति उच्च गुणवत्ता धारक संकल्पनांना विद्यापीठात नव्याने स्थापन झालेल्या **Research & Innovation park, Incubation Center,** या उद्योजक विकास योजना तसेच **ASPIRE,Post-Doctoral Research Fellow** सारख्या संशोधन प्रोत्साहन योजनांशी जोडून **Start-up** तसेच बौध्दिक संपदा हक्कात रूपांतरण करण्याची प्रक्रिया गतीमान करण्यात येईल.

९. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्थातील प्रत्येकी एका अनुभवी प्राध्यापकांना संशोधन समन्वयक **(Academic &Research Co-ordinator)** म्हणून नेमण्यात आले आहे. संबधित महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थांचे संचालक व शैक्षणिक व संशोधन समन्वयक यांच्या सक्रिय सहभागातून विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्ती वाढीस लावून संशोधन संस्कृती बळकट करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे.

१०. विद्यार्थ्यांचं यश हे संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थांचे संचालक व शैक्षणिक व संशोधन समन्वयक या सर्वांचा सक्रिय सहभाग व सहकार्यावर अवलंबून असल्याने विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी वेब पोर्टलच्या माध्यमातून योग्य व्यवस्था निर्माण करण्यात येत आहे. अविष्कार संशोधन प्रक्रियेमध्ये शैक्षणिक व संशोधन समन्वयकांच्या सक्रिय सहभागाचे महत्व लक्षात घेऊन प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख यांनी आपआपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विद्यापीठ विभागातील विद्यार्थ्यांची कार्यशाळा घेऊन त्यांना मार्गदर्शन करून प्रोत्साहित करावे.

११. शैक्षणिक वर्ष २०१९–२० च्या 'अविष्कार' या राज्य स्तरीय संशोधन स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळामार्फत दि. १५ नोव्हेंबर, २०१९ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत प्राप्त होणारे संशोधन प्रकल्प ग्राहय राहतील.

स्पर्धेचे सविस्तर वेळापत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**गणेशखिंड, पुणे ४११००७.**
**जा.क्र.अं.गु.सि.क./** 604
**दि.** 15 **ऑक्टोबर, २०१९**

(मुं.वि. रासवे) 17/10/19
उपकुलसचिव
अंतर्गत गुणवत्ता सिध्दताकक्ष
(अतिरिक्त कार्यभार)

**प्रत:–**

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये.
२. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था.
३. मा. विभागप्रमुख/मा. संचालक, सर्व विद्यापीठ विभाग/केंद्र.

# Savitribai Phule Pune University

(Formerly University of Pune)

| Tentative schedule for the activities of Avishkar 2019-20 | | |
|---|---|---|
| Sr.No. | Particulars | Dates |
| 1 | Submission of ideas through online portal (Level-1) | 15 Nov., 2019 |
| 2 | Assessment & shortlisting of ideas (Level-1) | 25 Nov., 2019 |
| 3 | District Leve cum Mentoring (Level-2) | 10 to 15 Dec., 2019 |
| 4 | University Level (Level-3) | 26 to 30 Dec., 2019 |
| 7 | Team selection for State level | 01 to 03 Jan., 2020 |

17/X/19

Deputy Registrar
Internal Quality Assurance Cell
(Additional Charge)